ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६४ /२०२६ दि. २६/०३/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणेनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि.१९/०३/२०२६ रोजी सकाळी ०६:०० वा. ते ११:०० वा. दरम्यान **'गुढीपाडवा'** सणानिमित्त सौ. आश्विनी बापट, कार्यवाह/सचिव यांचे मार्गदर्शनाखाली नववर्ष स्वागतयात्रा आयोजित करण्यात आलेली आहे. यात्रेनिमित्त भाविकांची गर्दी होणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) कोर्टनाका सर्कलकडुन जांभळी नाका व मुख्य मार्केटमध्ये जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, कोर्टनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, कोर्टनाका येथून सरळ आनंद आश्रम मार्गे टॉवर नाका सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) महागिरी व खारकर आळीकडुन जांभळी नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **महाजनवाडी हॉल, खारकर आळी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने महाजनवाडी हॉल येथून डावे वळण घेवून कोर्ट नाका सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) दादोजी कोंडदेव स्टेडीयम व मुस चौक कडून मुख्य बाजारपेठ मार्गे जांभळी नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ए वन फर्निचर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने ए वन फर्निचर येथून डावे वळण घेवून राघोबा शंकर रोड व माता रमाबाई चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

नो पार्किंग – जनता फॅशन कॉर्नर ते ए वन फर्निचर व ए वन फर्निचर ते जांभळी नाका दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणत्याही प्रकारची वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि.१९/०३/२०२६ रोजी सकाळी ०५:०० ते ११:३० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रत माहितीसाठी,

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

सहायक पोलीस आयुक्त, ठाणे वाहतूक विभाग, पो.नि. ठाणेनगर वाहतूक उपविभाग.